**विषय: ग्रामीण सेवेच्या प्रवासी दरात झालेल्या दरवाढीची अंमलबजावणी करण्याबाबत.**

==============

१) महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या आपोआप भाडेवाढ सूत्रातील प्रमुख ४ घटकांच्या मुल्यात बदल झाल्याने यानुसार येणाऱ्या सुधारीत प्रवास भाडेवाढीस राज्य परिवहन प्राधिकरणाने मंजुरी दिली असुन सुधारीत प्रवास भाडेदर दिनांक १३ मार्च, २०१० म्हणजेच दिनांक १२ मार्च, २०१० व १३मार्च, २०१० च्या मध्यरात्रीपासून महामंडळाच्या सर्व प्रवासी वाहतूक सेवांच्या प्रवास भाडे दरात वाढ करण्याचा निर्णय महामंडळाने घेतलेला आहे.

२) दिनांक १३ मार्च,२०१० पासुन (म्हणजेच दिनांक १२ मार्च, २०१० व १३मार्च, २०१० च्या मध्यरात्रीपासून) वा तदनंतर प्रवास सुरु करणाऱ्या प्रवाशांना सुधारीत दराने तिकीट आकारणी करावयाची आहे. ज्या प्रवाशांनी आगावू आरक्षण केले असेल, त्यांना वाहकाने त्या आरक्षण तिकिटाचा जुना तिकीट दर व नवीन तिकीट दर यातील फरक त्या तिकीट धारकाकडून वसुल करावयाचा आहे. थोडक्यात दिनांक १३मार्च, २०१० (१२ मार्च, २०१० व १३ मार्च, २०१० ची मध्यरात्र) च्या ००.०० तासापासून प्रवास सुरु करणा-या प्रवाशांकडून सुधारित भाडेदराने भाडे आकारणी करावयाची आहे. ज्या प्रवाशांचा दिनांक १२ मार्च २०१० रोजी प्रवास सुरु होऊन तो दिनांक १३ मार्च २०१०ला किंवा तदनंतर संपत आहे अशा प्रवाशांकडुन जुने व सुधारीत प्रवास भाडे फरकाची रक्कम वसुल करण्यांत येऊ नये.

३. **<u>ग्रामीण सेवांचे सुधारीत प्रवास भाडे दर</u>** :-

| सेवेचा प्रकार | सध्याचे प्रवासी दर (प्रतिटप्पा रुपयात ) | दिनांक १३ मार्च, २०१० पासून लागू करावयाचे दर (प्रतिटप्पा रुपयात ) | प्रथम टप्प्यास किमान प्रवासभाडे (रुपयात) प्रौढ | मुले |
|---|---|---|---|---|
| जनता | ३.३० | ३.७० | ४.०० | २.०० |
| साधी (साधी, मिनी ) | ३.९० | ४.२० | ४.०० | २.०० |
| जलद | ३.९० | ४.२० | ४.०० | २.०० |
| रात्रसेवा | ४.३० | ४.९५ | ५.०० | ३.०० |
| निमआराम | ५.०० | ५.७५ | ६.०० | ३.०० |
| डिलक्स | ६.९० | ८.७५ | ९०० | ५.०० |
| महाबस वातानुकूलित | ७.५० | ९.००* | ९.०० | ५.०० |
| शिवनेरी वातानुकूलित | ८.२५ | ९.२५* | ९.०० | ५.०० |

वातानुकूलित सेवांचे प्रवास भाडेदर ठरविताना ५.५% प्रवासी कर विचारात घेतलेला आहे.

४. **<u>रूपयाच्या पटीत भाडे आकारणीबाबत.</u>**

राप / वाह / चालन / सा.८८ / भाडेवाढ / ५१५५ दिनांक १० ऑगस्ट, २००६ - (परिपत्रक क्र.३४/२००६) मध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे ४९ पैशापर्यंतचा भाग सोडून देण्यात आला असून ५० पैसे व त्यापुढील भाग रुपयाच्या पटीत धरण्यात आला आहे, तसेच ज्या मार्गावर ठोक दराचा ( Flat Rate ) वापर करण्यात आला आहे, तेथे आकारणी करताना रु.२.५० च्या आतील भाग सोडून देण्यात आला असून रु.२.५० व त्यापुढील भाग रु.५ च्या पटीत आकारण्यात आला आहे.

५. **<u>ठोक भाडे :-</u>** सर्व सेवांचे आरक्षण आकार पूर्वीप्रमाणेच असून ज्या मार्गावर ठोक भाडे आकारून वाहतूक केली जाते त्या ठिकाणी प्रतिआसन आरक्षण आकार साध्या सेवेसाठी रू.५/-, निमआराम व डिलक्स सेवेसाठी रु.७/- व वातानुकूलित (शिवनेरी / महाबस) सेवेसाठी रू.१०/- आकारण्यात यावेत. तसेंच ठोक भाडे (Flat Rate) आकारणी करताना रू. २.५० च्या आतील भाग सोडून देण्यात आला असून रू. २.५० व त्यावरील भाग वरच्या पटीत अर्थात रू. ५/- च्या पटीत धरण्यात आला आहे. खालील तक्तया मध्ये विनावाहक व इतर फे-यांच्या मार्गावरील ठोक भाडे आरक्षण आकारासहित (Flat Rate) दाखविण्यात आले आहे.

## ठोक भाडे

| सेवेचा प्रकार | मार्गाचे नांव | प्रवासाचे टप्पे | प्रति टप्पा दर (रु.) | प्रति टप्पा दराप्रमाणे येणारे भाडे (रु.) | आरक्षण आकार (रुपये) | आरक्षण आकार मिळून येणारे भाडे (रु.) | मार्गाचे ठोक भाडे (आरक्षण आकारासहीत ) (Flat rate ) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | **प्रौढ** | **मुले** |
| शिवनेरी | दादर - पुणे रे.स्टे. मार्गे वाकड | २६ | ९.२५ | २४०.५० | १०.०० | २५०.५० | २५० | १३० |
| | मैत्रीपार्क - पुणे रे.स्टे. मार्गे वाकड | २६ | ९.२५ | २४०.५० | १०.०० | २५०.५० | २५० | १३० |
| | वाशी - पुणे रे. स्टे. मार्गे वाकड | २३ | ९.२५ | २१२.७५ | १०.०० | २२२.७५ | २२५ | ११५ |
| | पुणेरे.स्टे. - दादर मार्गे वाकड | २६ | ९.२५ | २४०.५० | १०.०० | २५०.५० | २५० | १३० |
| | औंध परिहार चौक - दादर | २६ | ९.२५ | २४०.५० | १०.०० | २५०.५० | २५० | १३० |
| | वाकड - दादर | २३ | ९.२५ | २१२.७५ | १०.०० | २२२.७५ | २२५ | ११५ |
| शिवनेरी | दादर - पुणे रे. स्टे. मार्गे चिंचवड | २६ | ९.२५ | २४०.५० | १०.०० | २५०.५० | २५० | १३० |
| | मैत्रीपार्क - पुणे रे.स्टे. मार्गे चिंचवड | २६ | ९.२५ | २४०.५० | १०.०० | २५०.५० | २५० | १३० |
| | वाशी - पुणे रे. स्टे. मार्गे चिंचवड | २३ | ९.२५ | २१२.७५ | १०.०० | २२२.७५ | २२५ | ११५ |
| | पुणेरे.स्टे. - दादर मार्गे चिंचवड | २६ | ९.२५ | २४०.५० | १०.०० | २५०.५० | २५० | १३० |
| | चिंचवड - दादर | २३ | ९.२५ | २१२.७५ | १०.०० | २२२.७५ | २२५ | ११५ |
| | निगडी - दादर | २३ | ९.२५ | २१२.७५ | १०.०० | २२२.७५ | २२५ | ११५ |
| | स्वारगेट - वाशी | २४ | ९.२५ | २२२.०० | १०.०० | २३२.०० | २३० | १२० |
| | वाशी - स्वारगेट | २४ | ९.२५ | २२२.०० | १०.०० | २३२.०० | २३० | १२० |
| शिवनेरी | शिवाजी नगर - नाशिक | ३६ | ९.२५ | ३३३.०० | १०.०० | ३४३.०० | ३४५ | १७५ |
| | नाशिकफाटा - नाशिक | ३६ | ९.२५ | ३३३.०० | १०.०० | ३४३.०० | ३४५ | १७५ |
| | भोसरी - नाशिक | ३६ | ९.२५ | ३३३.०० | १०.०० | ३४३.०० | ३४५ | १७५ |
| | शिवाजी नगर - संगमनेर | २४ | ९.२५ | २२२.०० | १०.०० | २३२.०० | २३० | १२० |
| | भोसरी - नाशिकरोड | ३६ | ९.२५ | ३३३.०० | १०.०० | ३४३.०० | ३४५ | १७५ |
| | शिवाजीनगर - नारायणगांव | १३ | ९.२५ | १२०.२५ | १०.०० | १३०.२५ | १३० | ७० |
| | नारायणगांव - नाशिक | २४ | ९.२५ | २२२.०० | १०.०० | २३२.०० | २३० | १२० |
| | नारायणगांव - नाशिकरोड | २४ | ९.२५ | २२२.०० | १०.०० | २३२.०० | २३० | १२० |
| | नारायणगांव - संगमनेर | १२ | ९.२५ | १११.०० | १०.०० | १२१.०० | १२० | ६५ |
| | संगमनेर - नाशिक | १२ | ९.२५ | १११.०० | १०.०० | १२१.०० | १२० | ६५ |
| निमआराम | स्वारगेट - सातारा | १७ | ५.७५ | ९७.७५ | ७.०० | १०४.७५ | १०५ | ५५ |
| साधी | स्वारगेट - सातारा | १७ | ४.२० | ७१.४० | ५.०० | ७६.४० | ७५ | ४० |
| निमआराम | स्वारगेट - बारामती | १७ | ५.७५ | ९७.७५ | ७.०० | १०४.७५ | १०५ | ५५ |
| साधी | स्वारगेट - बारामती | १७ | ४.२० | ७१.४० | ५.०० | ७६.४० | ७५ | ४० |

परतीच्या प्रवासासाठी वरीलप्रमाणे ठोकभाडे आकारणी करण्यात यावी. वरील फेऱ्यांसहीत ज्या फेऱ्यांना ठोक भाडे (फ्लॅट रेट) दराने भाडे आकारणी करण्यात येत आहे त्या फेऱ्यांचे वरील प्रमाणे सुधारीत दरपत्रक विभागीय पातळीवर संगणकावर भरून घेण्यात यावे व ते ईटीआयएम मशीन मध्ये सिंक्रोनाईज करण्यात यावे.

६. अजिंठा टी जंक्शन ते अजिंठा लेणी या मार्गावरील भाडे दरात कोणताही बदल केलेला नाही. त्यामुळे सध्याचे दर पुढील सूचनेपर्यंत चालू राहातील.

७. **<u>शहरीसेवा (प्रवासी भाडेदर तक्ता)</u>**

राज्य शासनाने अधिसूचना क्र. एमव्ही ए - ०६०४ / १३२८ / प्र.क्र.७५ / परि - २ दिनांक २०.१२.२००५ अन्वये शहरी सेवेच्या भाडेदरात दिलेल्या किमान व कमाल मर्यादेत वाढ केली असून राज्य परिवहन प्राधिकरण मुंबई यानी त्यांचे पत्र क्र. पआ / रापप्रा-१(२) / एसटी शहर भाडेवाढ / नस्ती क्र. २७ / ०६ / जा. क्र. १०३६७ दिनांक ७.०६.२००६ अन्वये महामंडळाचे अधिकारी भाडेवाढीचा प्रस्ताव तो घेऊन आल्यास तो प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी ठेवण्यात यावा असे सर्व प्रादेशिक परिवहन प्राधिकरण याना कळविलेले असून त्याची प्रत या कार्यालयास दिलेली आहे. या कार्यालयाचे पत्र क्र. राप/वाह/ चालन / सा.८८/शहरी सेवा/४७७६ दिनांक २१ जून, २००८ अन्वये दिलेल्या सुचनेनुसार सध्या दिनांक २५.०६.२००८ पासून चालनात असलेले दर शहरी सेवेसाठी लागू आहेत. आपोआप भाडेवाढ सूत्रातील डिझेल व अन्य घटकांच्या किंमतीत वाढ झाल्याने वर नमूद केलेल्या शासन अधिसूचनेत दिलेल्या मर्यादेच्या अधिन राहून शहरी सेवेच्या भाडेदरात वाढ करण्यात येत

..३..

आहे. ज्या शहरांमध्ये रा.प.ची शहर वाहतुक चालू आहे तेथे तेथील प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाची मंजूरी घेऊन सदर शहरी सेवेच्या प्रवासी भाडेदराची अंमलबजावणी ग्रामीण सेवेच्या दरांच्या अंमलबजावणीसोबतच दिनांक १३मार्च, २०१० पासून (दि. १२मार्च, २०१० व १३ मार्च, २०१० च्या मध्यरात्री ) करण्यात यावी. शासन अधिसूचना व राज्य परिवहन प्राधिकरणाचे पत्र यापूर्वी उपरोक्त संदर्भित भाडेवाढीच्या पत्रासोबत पाठविण्यात आलेले आहे. अधिक माहितीसाठी सोबत शासन अधिसूचना व राज्य परिवहन प्राधिकरणाचे पत्र पाठविण्यात येत आहे.

## शहरीसेवा (सुधारीत प्रवासी भाडेदर तक्ता)

| किमान व कमाल दर (अधिसूचना क्र. एम व्हीए-०६०४/ १३२८/प्रक्र.७५/परि-२ दि. २०.१२.२००५ प्रमाणे | | | दिनांक २५.०६.२००८ पासून सध्याचे दर | | दिनांक १३ मार्च २०१० पासून लागू करावयाचे दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| किलोमिटर Exceeding-Not Exceeding | किमान रूपये | कमाल रूपये | प्रौढ | मुले | प्रौढ | मुले |
| २ कि.मी. पर्यंत | २.०० | ८.०० | ५.०० | ३.०० | ५.०० | ३.०० |
| २ पेक्षा जास्त ४ कि.मी. पर्यंत | ३.०० | १०.०० | ५.०० | ३.०० | ५.०० | ३.०० |
| ४ पेक्षा जास्त ६ कि.मी.पर्यंत | ४.०० | १४.०० | ६.०० | ३.०० | ६.०० | ३.०० |
| ६ पेक्षा जास्त ८ कि.मी.पर्यंत | ५.०० | १८.०० | ७.०० | ४.०० | ७.०० | ४.०० |
| ८ पेक्षा जास्त १० कि.मी.पर्यंत | | | ९.०० | ५.०० | ९.०० | ५.०० |
| १० पेक्षा जास्त १२ कि.मी.पर्यंत | ७.०० | २२.०० | १०.०० | ५.०० | ११.०० | ६.०० |
| १२ पेक्षा जास्त १४ कि.मी. पर्यंत | | | १२.०० | ६.०० | १३.०० | ७.०० |
| १४ पेक्षा जास्त १६कि.मी. पर्यंत | ८.०० | २६.०० | १३.०० | ७.०० | १५.०० | ८.०० |
| १६ पेक्षा जास्त १८कि.मी. पर्यंत | | | १५.०० | ८.०० | १८.०० | ९.०० |
| १८ पेक्षा जास्त २० कि.मी. पर्यंत | ९.०० | ३०.०० | १७.०० | ९.०० | २०.०० | १०.०० |
| २० पेक्षा जास्ट २२ कि.मी. पर्यंत | | | २०.०० | १०.०० | २२.०० | ११.०० |
| २२ पेक्षा जास्त २४ कि.मी.पर्यंत | १०.०० | ३४.०० | २२.०० | ११.०० | २४.०० | १२.०० |
| २४ पेक्षा जास्त २६ कि.मी. पर्यंत | | | २४.०० | १२.०० | २६.०० | १३.०० |
| २६ पेक्षा जास्त २८ कि.मी. पर्यंत | ११.०० | ३८.०० | २५.०० | १३.०० | २८.०० | १४.०० |
| २८ पेक्षा जास्त ३० कि.मी. पर्यंत | | | २८.०० | १४.०० | ३०.०० | १५.०० |
| ३० पेक्षा जास्त ३२ कि.मी. पर्यंत | १२.०० | ४२.०० | २८.०० | १४.०० | ३०.०० | १५.०० |
| ३२ पेक्षा जास्ट ३४ कि.मी. पर्यंत | | | २८.०० | १४.०० | ३२.०० | १६.०० |
| ३४ पेक्षा जास्त ३६ कि.मी.पर्यंत | १३.०० | ४६.०० | २८.०० | १४.०० | ३२.०० | १६.०० |
| ३६ पेक्षा जास्त ३८ कि.मी. पर्यंत | | | ३१.०० | १६.०० | ३४.०० | १७.०० |
| ३८ पेक्षा जास्त ४० कि.मी. पर्यंत | १४.०० | ५०.०० | ३१.०० | १६.०० | ३४.०० | १७.०० |
| ४० पेक्षा जास्त ४२ कि.मी. पर्यंत | | | ३१.०० | १६.०० | ३६.०० | १८.०० |
| ४२ पेक्षा जास्त ४४ कि.मी. पर्यंत | १५.०० | ५४.०० | ३५.०० | १८.०० | ३६.०० | १८.०० |
| ४४ पेक्षा जास्ट ४६ कि.मी. पर्यंत | | | ३५.०० | १८.०० | ३८.०० | १९.०० |

८. ५ ते १२ वर्षापर्यंतच्या मुलांसाठी घेण्यात येणा-या अर्ध्या आकाराची (Half Ticket) सवलत चालू राहिल. तसेच, पालकासोबत असणाऱ्या ५ वर्षाखालील मुलांना मोफत प्रवासाची सवलत पूर्वीप्रमाणे चालू राहील.

९. **<u>उप टप्पा सुविधा:</u>**
उपटप्पा सुविधा देण्याची पध्दत यापुढेही कायम ठेऊन ती ५ टप्प्यापर्यत देण्यात येत आहे.

१०. **रात्र सेवा :-** रात्रसेवा म्हणजे निमआराम, आराम, डिलक्स व वातानुकूलित या सेवांशिवाय जी सेवा सायंकाळी ७.०० वाजता ते दुसऱ्या दिवशी पहाटे ५.०० वाजेपर्यंतच्या कालावधीमध्ये कमीत कमी ६ तास धावणारी सेवा होय

११. जेष्ठ नागरिकांना देण्यात येणा-या सवलतीत कोणताही बदल झालेला नाही. त्यामुळे जेष्ठ नागरीकाना वितरीत करण्यात येणा-या तिकिटांच्या प्रकारात कोणताही बदल झालेला नाही. ज्या आगारांत ईटीआयएम मशीनचा वापर सुरु आहे त्या ठिकाणी यापुर्वी दिलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

==========